शाळांचे मूल्यांकन व प्रमाणिकरण करण्यासंदर्भात गठित करण्यात आलेल्या राज्य सल्लागार समितीची व्याप्ती वाढविणेसंदर्भात.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय, क्रमांक- माशाअ-२००९/(२५१ /०९)/माशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- 03 जुलै २००९.

**शासन निर्णय :-**

दि. २७ मे २००९ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील शाळांचे मूल्यांकन व प्रमाणिकरण करण्यासंदर्भात राज्य सल्लागार समिती गठित करण्यात आलेली आहे. दि. २५ जून २००९ रोजी राज्य सल्लागार समितीच्या प्रथम बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सदर समितीची व्याप्ती वाढविण्यात येत असून दि. २७ मे २००९ मधील शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्यातील शाळांचे मूल्यांकन व प्रमाणिकरण करण्यासंदर्भातील धोरण निश्चित करण्याप्रमाणेच खालील मुद्यांसंदर्भात देखील समितीने राज्य शासनास अहवाल सादर करावा :-

१) डायट या प्रशिक्षण संस्थेची गुणवत्ता वाढविणे.

२) एनसीईआरटी अभ्यासक्रमाची पुस्तके राज्य मंडळाशी संलग्नित शाळांमध्ये उपयोगात आणणे.

३) राज्यमंडळ व विभागीय मंडळांवर सदस्य नियुक्तीकरिता निकष तसेच कालमर्यादा निश्चित करणे.

२. राज्य सल्लागार समितीने तीन महिन्यांच्या कालावधीत उपरोक्त तीन बाबींवर शासनास अहवाल सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. 200907031710190001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( डॉ. सुवर्णा सि. खरात )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.